महाराष्ट्र शासन

# सहायक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण, मुंबई उपनगर यांचे कार्यालय

नवीन प्रशासकीय इमारत, ४ था मजला, आर.सी.चेंबुरकर मार्ग, चेंबुर, मुंबई — ४०००७१.
दुरध्वनी क्र. ०२२-२५२२२०२३ ईमेल- advjntobcsbcmumsub@gmail.com

जा.क्र.इमाबक/मुंउप/वसतिगृह/२०२६-२७/ ५२७ दिनांक- १६/०९/२०२६

प्रति,

प्राचार्य/संचालक,

सर्व महाविद्यालये,

**विषय :-** इतर मागास प्रवर्ग, विमुक्त जाती भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी शासकीय वसतीगृह योजना, ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार व पंडित दिनदयाळ उपाध्याय स्वयंम योजनेअंतर्गत सन २०२६-२०२७ या शैक्षणिक वर्षातील प्रवेश प्रक्रियेस मुदतवाढ देण्यात आल्याबाबत.

**संदर्भ:-** १. मा.संचालक, इतर मागास बहुजन कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र.५२६६ दि.१५.०९.२०२६

२. या कार्यालयाची आधार व स्वयंम योजनेसाठीची प्रेसनोट क्र.५२५ दि.१६.०९.२०२६

३. या कार्यालयाची वसतिगृहसाठीची प्रेसनोट क्र.५२६ दि.१६.०९.२०२६

उपरोक्त विषयास अनुसरून आपणास कळविण्यात येते की, इतर मागास बहुजन कल्याण विभागाच्या "राज्यातील इतर मागास प्रवर्ग, विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्ग या प्रवर्गातील व्यावसायिक व बिगर व्यावसायिक शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी जिल्हानिहाय वसतीगृहे सुरू करणे" या योजनेंतर्गत मुंबई उपनगर जिल्ह्यासाठी इतर मागास बहुजन कल्याण मुलांचे शासकीय वसतीगृह, ठाणे-कल्याण येथे मोफत वसतिगृह सुरू करण्यात आले आहे. सदर योजनेअंतर्गत विद्यार्थ्यांना मोफत निवासासोबत भोजन भत्ता व निर्वाह भत्ता देखील अनुज्ञेय राहील.

इतर मागास प्रवर्ग, विमुक्त जाती भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी शासकीय वसतीगृह योजना, ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार व पंडित दिनदयाळ उपाध्याय स्वयंम योजना या १२ वी नंतर व्यावसायिक व अव्यावसायिक शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी राबविण्यात येतात. या योजनांची प्रवेश प्रक्रिया Online पद्धतीने राबविण्यासाठी वसतीगृह प्रवेश प्रणाली कार्यान्वित करण्यात आलेली आहे.

त्यानुषंगाने, राज्यातील इतर मागास प्रवर्ग, विमुक्त जाती भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी शासकीय वसतीगृह योजना, ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार व पंडित दिनदयाळ उपाध्याय स्वयंम योजनेअंतर्गत रिक्त असलेल्या जागेवर व्यावसायिक व अव्यावसायिक विद्यार्थ्यांचे प्रवेश सुरू करण्यात आले होते.

करिता, वसतीगृह प्रवेश प्रणालीमध्ये येत असलेल्या तांत्रिक अडचणींचे निराकरण तसेच विद्यार्थ्यांना OTP पडताळणी पूर्ण करून त्यांचे अर्ज यशस्वीरित्या सादर करता यावेत, यासाठी प्रवेश अर्ज सादर करण्याच्या मुदतीत वाढ करण्याबाबत विनंती करण्यात आलेली आहे.

त्यानुसार, वसतीगृह संकेतस्थळावर अर्ज करताना विद्यार्थ्यांना येत असलेल्या तांत्रिक अडचणी तसेच OTP पडताळणी पूर्ण करण्यासाठी व्यावसायिक व अव्यावसायिक अभ्यासक्रमातील नवीन विद्यार्थ्यांना Online प्रवेश अर्ज सादर करण्यासाठी दि. ३०.०९.२०२६ पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली आहे.

Scanned with OKEN Scanner

तरी, आपल्या महाविद्यालयातील इतर मागास प्रवर्ग, विमुक्त जाती भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गातील पात्र विद्यार्थ्यांना सदर मुदतवाढीबाबत अवगत करून त्यांनी **दि.३०.०९.२०२६ पर्यंत Online अर्ज सादर करावेत**, याबाबत आपल्या स्तरावरून आवश्यक ती कार्यवाही करावी.

तसेच, सदर मुदतवाढीची माहिती महाविद्यालयाच्या सूचना फलकावर, Social Media Platform तसेच WhatsApp Group वर प्रसिद्ध करण्यात यावी, जेणेकरून पात्र विद्यार्थ्यांना सदर योजनांचा लाभ घेता येईल.

**सदर वसतीगृहाचा पत्ता खालीलप्रमाणे आहे :**

**इतर मागास बहुजन कल्याण मुलांचे शासकीय वसतीगृह, ठाणे-कल्याण** कृषी उत्पन्न बाजार समिती येथील इमारत क्र.ए-१०, पहिला मजला, कल्याण, जिल्हा ठाणे – ४२१३०१.

अधिक माहिती साठी सहायक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण, मुंबई उपनगर नवीन प्रशासकीय इमारत, ४ था मजला, आर.सी.चेंबुरकर मार्ग, चेंबुर, मुंबई – ४०००७१. या कार्यालयास संपर्क साधावा.

(विजय कुडवे)
सहायक संचालक,
इतर मागास बहुजन कल्याण,
मुंबई उपनगर

**प्रत- माहितीस्तव सविनय सादर**

१. मा.संचालक, इतर मागास बहुजन कल्याण, संचलनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
२. मा. प्रादेशिक उपसंचालक इतर मागास बहुजन कल्याण विभाग, मुंबई

Scanned with OKEN Scanner